**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 40** **September - October - 2025**

# भारतीय आदिवासी समुदाय: भूतकाळ, वर्तमान व भविष्य

**अशोक भीमराव वाघमोडे[1], प्रा. डॉ. भिल्लारे व्ही. बी.[2]**
*[1]संशोधक विद्यार्थी (पीएच.डी) वसंतदादा पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालय, पाटोदा.*
*[2]सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख,कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि.बिड.*
*Corresponding Author – अशोक भीमराव वाघमोडे*
**DOI - 10.5281/zenodo.17657017**

***गोषवारा :***

*भारतीय समाजाची सांस्कृतिक व ऐतिहासिक संरचना विविधतेने परिपूर्ण आहे. या विविधतेतील महत्त्वाचा घटक म्हणजे आदिवासी समुदाय. भारतीय आदिवासी हे प्राचीन काळापासून जंगल, डोंगर व निसर्गाच्या सानिध्यात राहून स्वतःची वेगळी सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक ओळख जपत आले आहेत. परंतु, बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीमध्ये त्यांचे पारंपारिक जीवनमान, सांस्कृतिक परंपरा, शिक्षण व आरोग्य या क्षेत्रात मोठे परिवर्तन दिसून येते. प्रस्तुत संशोधनात आदिवासींच्या भूतकाळातील स्थिती, वर्तमानातील आव्हाने व भविष्याची संधी यांच्या दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे.*

***बीजसंज्ञा : आदिवासी समुदाय, भूतकाळ, वर्तमान, भविष्य.***

**प्रस्तावना :**

भारत हा विविध वंश, धर्म, भाषा आणि संस्कृतीचा संगम आहे. देशातील विविधता ही भारतीय समाजाची एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये मानली जाते. या विविधतेमुळे समाजात अनेक जाती-जमाती, परंपरा आणि जीवन पद्धती निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे आदिवासी समुदायाचा विशेष स्थान आहे. भारतातील आदिवासी लोके प्रामुख्याने निसर्गाशी एकरूप होऊन जगणारे समाज घटक आहेत. जंगल, डोंगर प्रदेशात किंवा दुर्गम भागामध्ये वस्ती करणाऱ्या या समाजाला ऐतिहासिक दृष्ट्या ‘आदिवासी’ असे संबोधले गेले आहे. भारतीय संविधानात या समुदायाला अनुसूचित जमाती (Schedule Tribes) असे म्हटले आहे. जनगणना २०११ नुसार भारतात सुमारे ११ कोटींहून अधिक आदिवासी लोक राहतात. जे देशाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास ८.६ टक्के आहेत. तथापि, औद्योगीकरण, शहरीकरण व जागतिकीकरणामुळे त्यांच्या पारंपारिक जीवनशैलीत मोठे बदल घडले आहेत. या पार्श्वभूमीवर आदिवासी समुदायाचा भूतकाळ, वर्तमान व भविष्य याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**आदिवासी समुदायाचा अर्थ आणि व्याख्या:**

**Tribes** या इंग्रजी शब्दाचा अर्थ जमात किंवा जमाती असा होतो. आदिपासून किंवा सुरुवातीपासूनच दऱ्याखोऱ्यात डोंगराळ किंवा जंगलात वास्तव करणारे लोक म्हणजे आदिवासी.

**व्हेरियर इल्विन आणि ठक्कर बाप्पा,** यांनी आदिवासींना **'Aboriginal'** असे संबोधले आहे. **'Aboriginal'** याचा अर्थ **'मूळचे निवासी'** असा होतो.[१]

**व्याख्या :**

१) **पेरी :** यांच्या मते,"समान बोली बोलणाऱ्या आणि समान भूप्रदेशावर राहणाऱ्या समूहाला आदिवासी समुदाय म्हणतात".[२]

२) **मदन आणि मुजूमदार :** यांच्या मते,"समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिकदृष्टीने परस्पर संबंधित असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समुश्चयाचा उल्लेख जमात म्हणून केला जातो".[३]

**संदर्भ साहित्याचे अवलोकन :**

**१) गारे गोविंद (२००२) "महाराष्ट्रातील आदिवासी जमाती":**

गारे गोविंद हे दीर्घळाल प्रशासकीय सेवेत कार्यरत असताना आदिवासी प्रश्नांचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेले अधिकारी होते.

त्यांनी आपल्या ग्रंथात महाराष्ट्रातील विविध आदिवासी जमातींच्या जीवन शैलीचा व सामाजिक सांस्कृतिक संरचनेचा सविस्तर आढावा दिला आहे. या ग्रंथात आदिवासी प्रदेश, जीवनपद्धती विकासाच्या योजना आणि शासनाच्या उपक्रमांचा तपशील ऊहापोह करण्यात आलेला आहे. या प्रस्तुत ग्रंथातून आदिवासी प्रश्नांचा अभ्यास करतांना महत्त्वाचे आधारभूत स्रोत उपलब्ध झाले.

**२) सौ. शैलेजा व श.गो. देवगावकर (२००१) "आदिवासींचे विश्व":**

लेखकांनी भारतातील विविध प्रांतामध्ये विखुरलेल्या आदिवासी समाजाचे जीवन, संस्कृती आणि सामाजिक रचना यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. ग्रंथात आदिम जीवनशैली, धार्मिक प्रथा, देव-देवता, उत्सव, लोकसाहित्य, कुटुंब पद्धती, तसेच आधुनिक विकासाच्या समस्यांचा तपशील आढावा घेण्यात आलेला आहे. ग्रंथामध्ये भारतीय परिस्थितीतील तुलना अमेरिकेतील अन्य आदिवासी सामाजीशी करून आदिवासी जीवनातील साम्य व वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. त्यामुळे हे प्रस्तुत ग्रंथ आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्यातूनही आदिवासी जीवन समजून घेण्यास उपयुक्त ठरते.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

१) भारतीय आदिवासी समुदायाची भूतकाळ व सांस्कृतिक वारसाचा अभ्यास करणे.
२) भारतीय आदिवासी समुदायाचे वर्तमान सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
३) आदिवासी समुदायाचे भविष्यकाळातील विकासाच्या संधी व दिशा शोधणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन निबंधासाठी दुय्यम संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. व तथ्य संकलनासाठी प्रस्तुत विषयाशी संबंधित विभिन्न संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, आणि संकेतस्थळांचा वापर करण्यात आला आहे.

**भारतीय आदिवासी समुदाय: भूतकाळ:**

भारतीय आदिवासी समुदाय हा भारताच्या सामाजिक इतिहासाचा पाया मानला जातो. भारतीय उपखंडात प्राचीन काळापासून विविध वंशीय समूहांची वस्ती होती. त्यामध्ये आदिवासी मूळ रहिवासी असल्याचे अनेक इतिहासकारांचे मत आहे. याच कारणामुळे आदिवासींना 'अन्यतम प्राचीन वंशज' किंवा 'मूळनिवासी' असे संबोधले जाते. आदिवासींचे जीवनमान निसर्गाशी एकरूप होते. जंगल, नद्या, डोंगर आणि नैसर्गिक साधनसंपत्ती यांवर त्यांचे उपजीविकेचे आधार होते. शिकार, मासेमारी, फळे व कंदमुळे गोळा करणे आणि पशुपालन ही त्यांची पारंपरिक उपजीविकेची साधने होती. सामाजिक जीवनामध्ये समानता, सहकार्य व सामूहिकता यांना प्राधान्य दिले जात असे. कुठल्याही जाती-पातीच्या बंधनापेक्षा समूहातील परस्पर सहकार्य महत्त्वाचे मानले जात होते. त्यांच्या श्रद्धा परंपरा मुख्यतः निसर्ग पूजेशी निगडित होत्या. सूर्य, चंद्र, झाडे, नद्या, डोंगर, प्राणी यांना देवतासमान मानून पुजले जाई. या श्रद्धांचा आधार घेऊन त्यांचे सण, उत्सव साजरा करत. इतिहासाच्या सुरुवातीच्या काळात आदिवासींचे स्वतंत्र राज्यसत्तेशी फारशे संबंध नव्हते. ते जंगल डोंगराळ प्रदेशात राहून स्वतंत्रपणे जीवन जगत असत. तथापि, आर्य समाजाच्या आगमनानंतर आणि पुढील काळातील राजकीय उलथ्यापालथीत आदिवासी समुदाय हळूहळू 'वनवासी', 'गिरीजन' किंवा 'जंगली' अशा संज्ञांनी ओळखला जाऊ लागला. त्यामुळे त्यांच्या स्वतंत्र सांस्कृतिक अस्तित्वावर मुख्य प्रवाहातील समाजाने उपेक्षित छाया टाकली.

भूतकाळात आदिवासी समुदायाने कला, संगीत, नृत्य, लोककथा आणि पारंपरिक वैद्यकशास्त्र यातून आपला समृद्ध वारसा जपला. निसर्गाशी निगडित ही सांस्कृतिक संपत्ती आजही त्यांच्यात जिवंत आहे. परंतु बदलांच्या प्रवाहात त्यांना सतत विस्थापन, उपेक्षा, आणि शोषणाचा सामना करावा लागला, यावरून दिसते की, भारतीय आदिवासी समुदाय भूतकाळ हा निसर्गाशी घट्ट बांधलेल्या, सामुदायिक सहजीवनावर आधारलेला आणि स्वतंत्र सांस्कृतिक ओळ जपणारा होता.

**भारतीय आदिवासी समुदाय: वर्तमान:**

**१) सामाजिक स्थिती :**

आदिवासी हे 'सीमांत समूह' मानले जातात. आजही अनेक आदिवासी समुदाय मुख्य प्रवाहापासून विलग राहतात. सामाजिक संरचनेत उपेक्षित घटक म्हणून ओळखले जातात. जातीभेद, दारिद्र्य, स्थलांतर, आणि अपेक्षा ही त्यांच्या सामाजिक जीवनातील प्रमुख आव्हाने आहेत.

**२) शैक्षणिक स्थिती :**

शिक्षण हे सामाजिक गतिशीलतेचे साधन आहे साधन आहे. परंतु आदिवासी समुदायांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. शाळाबाह्य मुलांची संख्या जास्त असून उच्च शिक्षणात त्यांचा सहभाग अल्प आहे. भाषेचे अडथळे, आर्थिक मर्यादा व सांस्कृतिक अंतर ही प्रमुख कारणे आहेत.

**३) आर्थिक स्थिती :**

आजच्या काळातही बहुसंख्या आदिवासी जंगलावर आधारित उपजीविका, संघटित क्षेत्रातील मजुरी व कृषी मजुरी यावर अवलंबून आहेत. औद्योगिकीकरणामुळे त्यांचे पारंपरिक संसाधन ऱ्हास झाले आहे, ज्यामुळे बेरोजगारी व दारिद्र्य वाढले आहे.

**४) आरोग्य व पोषण :**

आदिवासी समुदाय अजूनही प्राथमिक आरोग्य सेवेपासून वंचित आहे. कुपोषण, बालमृत्यू व

संसर्गजन्य रोगांचे प्रमाण जास्त आहे. आरोग्य सुविधा अपुरे असल्यामुळे त्यांच्या जीवनमानावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

**५) राजकीय सहभाग :**

लोकशाहीतील प्रतिनिधित्व ही सामाजिक समतेची ओळख आहे. संविधानाने आदिवासींना 'अनुसूचित जमाती' म्हणून ओळख दिल्यामुळे त्यांना आरक्षणाच्या माध्यमातून राजकीय प्रतिनिधित्व मिळाले आहे. तरीही प्रत्यक्ष राजकीय नेतृत्व व सक्षमीकरण मर्यादित आहे.

**भारतीय आदिवासी समुदाय : भविष्य:**

'भविष्य' हा केवळ काळखंडाचा निर्देश नसून समाजाच्या संभाव्य परिवर्तनाची दिशा आहे. मानवशास्त्रज्ञ मालिनोव्स्की, यांच्या मते,''समाजाची सातत्यपूर्णता ही बदलांशी जुळवून घेण्याच्या क्षमतेत आहे''. या व्याख्यानुसार, आदिवासी समुदायाचे भविष्य हे त्यांच्या पारंपरिक वारशाचे जतन व आधुनिकतेशी केलेल्या समन्वयावर अवलंबून आहे.

**१) शिक्षणाचा प्रसार :**

शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख साधन मानले जाते. आदिवासी समुदायाच्या भविष्यात शिक्षणाची भूमिका निर्णायक असेल. मातृभाषेत शिक्षण, तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण तसेच उच्च शिक्षणात वाढता सहभाग यामुळे आदिवासी समुदायाला सामाजिक व आर्थिक प्रगतीची नवी संधी मिळेल.

**२) आरोग्य सुधारणा :**

आरोग्य ही केवळ रोगाची अनुपस्थिती नसून शारीरिक, मानसिक व सामाजिक कल्याणाची अवस्था आहे. आदिवासी समुदायाच्या भविष्यात प्राथमिक आरोग्य केंद्राचे जाळे, पोषण पूरक योजना, मातृ-शिशू आरोग्य सुधारणा व स्थानिक औषधी ज्ञानाचा उपयोग यामुळे त्यांच्या जीवनमानात गुणात्मक बदल होऊ शकतो.

**३)आर्थिक संधी :**

शाश्वत विकास हीच भविष्यातील अर्थनीतीची दिशा आहे. आदिवासी समुदायासाठी लघुउद्योग, वन उत्पादन प्रक्रिया, हस्तकला, इको-टुरिझम व कृषी आधारित उद्योग यामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती शक्य आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि स्वयंरोजगाराच्या संधीमुळे त्यांची आर्थिक स्वयंपूर्णता साध्य होऊ शकते.

**४) सांस्कृतिक जतन :**

आदिवासी संस्कृतीचा नाश न करता तिच्या जतनातूनच विकास साधता येतो. भविष्यात आदिवासींच्या कला, लोकसाहित्य, परंपरा व भाषा यांच्या जतनाला धोरणात्मक प्राधान्य दिल्यास सांस्कृतिक विविधता टिकवता येईल.

**५) राजकीय सक्षमीकरण :**

लोकशाही उपेक्षित घटकांचे प्रतिनिधित्व हे सामाजिक न्यायाचे मूलभूत आहे. भविष्यात आदिवासी समाजाच्या राजकीय सक्षमीकरणावर भर दिला गेला तर निर्णय प्रक्रियेत त्यांच्या सक्रिय सहभाग वाढेल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आदिवासी नेतृत्व निर्माण होणे हे त्यांचे खरे सक्षमीकरण ठरेल

**निष्कर्ष :**

भारतीय आदिवासी समुदाय हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. भूतकाळात त्यांनी निसर्गाशी एकरूप राहून स्वतंत्र सांस्कृतिक वारसा जपला, वर्तमान ते अपेक्षा व आव्हानांना सामोरे जात आहेत. तर भविष्यकाळात शिक्षण, आरोग्य व रोजगार यामध्ये सुधारणा झाल्यास त्यांच्या सर्वांगीण विकास

साध्य होऊ शकतो. सरकार, स्वयंसेवी संस्था व समाजाने एकत्रितपणे प्रयत्न केल्यास आदिवासी समुदायाचा विकास भारताच्या सर्वांगीण प्रगतीला चालना देईल.

**संदर्भ ग्रंथ :**


१) आगलावे प्रदीप, (२०१२),'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्र. २

२) खडसे भा.कि, (२००४),'भारतीय समाज आणि सामाजिक समस्या', हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई. पृष्ठ क्र. २

३) काळदाते सुधा, (१९९१),'भारतीय सामाजिक संरचना पारंपारिक आणि आधुनिक', मराठवाडा विद्यापीठ प्रकाशन, औरंगाबाद. पृष्ठ क्र.९८

४) गोरे गोविंद, (२००२),'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्र.

५) सौ. शैलजा व श .गो. देवगावकर, (२००१),'आदिवासींचे विश्व', आनंद प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्र.